## अर्ज निशाणी क्रमांक ३३ खालील आदेश

**( पारीत केलेला दिनांक १८.०४.२०२३)**

**०१**. प्रस्तूतचा अर्ज वादींनी ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७*** अनुसार वादपत्रात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

**०२**. वादींचे असे म्हणणे आहे की, वादपत्रात अनावधानाने वाद मिळकत गट क्रमांक १८ ची चतुःसीमा तसेच वाद मिळकतीत एक विहीर असल्याचे आणि त्यामध्ये वादी व प्रतिवादींचा हक्क असल्याचे नमूद करण्याचे राहून गेले आहे.

**०३**. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वाद मुद्दे **नि.क्र.३२** दिनांक २५.०४.२०२२ रोजी निश्चित करण्यात आले आहेत. वादींनी दाव्यात पुरावा देण्याऐवजी दाव्याचे कामकाज प्रलंबीत ठेवण्याच्या हेतूने दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. वादी विहीरीबाबत नव्याने कथन नमूद करु पाहत आहेत. वादीचा अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. म्हणून प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०४**. वादींतर्फे विधीज्ञ **श्री. यु. बी. पाटील** आणि प्रतिवादींतर्फे विधीज्ञ **श्री. पी. एन. काळदाते** यांचा युक्तिवाद ऐकला.

**०५**. वादींनी वाटणी व ताब्यासाठी दावा दाखल केला आहे. वाद मुद्दे स्थापन झाले असले तरी अद्याप वादींचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. वादी वाद मिळकतीच्या चतुःसीमा तसेच वादी–प्रतिवादींच्या मालकीची एक विहीर असल्याची बाब वाद पत्रात नमूद करु पाहत आहेत. ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०२*** अनुसार दाव्याची रचना करत असताना वादीवर हे बंधन आहे की, त्याने वाद मिळकतीबाबत उपलब्ध असलेले सर्व हक्क तसेच सर्व मालमत्ता दाव्यात समावेश केली पाहिजे. ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०७*** अनुसार वाद मिळकतीची चतुःसीमा नमूद असणे आवश्यक आहे. वादींना वाद पत्रात प्रस्तावीत दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास दाव्याचा निकाल करण्यास सुलभ होणार आहे, तसेच गुंतागुंत टळणार आहे.

०६. ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७*** अनुसार दाव्याची सुनावणी सुरु झाल्यानंतर कथनांची दुरुस्ती करता येणार नाही असे बंधन आहे. प्रस्तूत दाव्यात वाद मुद्दे निश्चित झाले असले तरी अद्याप वादींचा पुरावा सुरु झालेला नाही. वादींना प्रस्तावीत दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादींना त्यांच्या कैफीयतीत दुरुस्ती करण्याची मुभा राहील. म्हणून वादींना वादपत्र कलम ३ मध्ये शेवटी आणि विनंती कलम १ मध्ये प्रस्तावीत दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायाचे आहे. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

**०१.** वादींचा अर्ज **नि.क्र.३३** खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादींना वादपत्रात प्रस्तावीत दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

**०३.** वादींनी वादपत्रात प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांत करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.04.18 17:36:07 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– १८.०४.२०२३.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**